# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती

*********************************************************

क्र.प्र.अ./भू.स/अ.का./कावि - ५२६ /१९ दिनांक :-१७/८/२०१९

*********************************************************

## "कलम - १९"

## घोषणा

(भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

क्रमांक - भु.सं.प्र.क्र. **८/४७/२०१०-२०११ मौजा बोरगांव तळणी ता.अचलपूर**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्र. ८७ दि. २४.०१.२०१९ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूचि दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे ; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त **सार्वजनिक प्रयोजनासाठी** उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित प्रयोजनासाठी **"बुडीत क्षेत्र"** म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) अ.व.प्र.क्र.४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती** यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गांव **बोरगांव तळणी** तालुका **अचलपूर** जिल्हा **अमरावती**

| अ. क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) | अ. क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६७ | २.०५ | ५ | ७० | ०.९५ |
| २ | ६९ | ०.९१ | ६ | ७१ | ०.८६ |
| ३ | ६८ | २.५० | ७ | ७२ | ०.९३ |
| ४ | ६६ | ०.९५ | - | - | - |
| **एकुण = ९.१५ हे.आर.** | | | | | |

## अनुसुची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

१) प्रकल्पाचे नांव :- वासणी प्रकल्प

२) प्रकल्प कार्याचे वर्णन :- वासणी प्रकल्प

३) सामाजिक मिळणारे लाभ :- वासणी प्रकल्पाचे बोरगांव तळणी नविन पुनर्वसनाच्या कामाकरीता

## अनुसूची तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावाचे नाव :- **निरंक** तालुका- **निरंक** जिल्हा- **निरंक**

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | **निरंक** | |

## अनुसुची चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

**निरंक**

**दिनांक :- / /२०१९**
**ठिकाण :- अमरावती**

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**अ.व.प्र.क्र.४ अमरावती**

(शैलेश नवाल)
**जिल्हाधिकारी, अमरावती**